कामगार आयुक्त
कार्यालय, मुंबई
[... विभाग]
दिनांक :- १४/१/०९
आवक क्र. :- १२०
नस्ती क्र. :- १८

अर्थ कार्यविभागांना कळवावे.
१७.१.०९

राज्यातील बंद आस्थापना/ कंपन्या / कारखाने/ गिरण्या यांच्या जमिनीच्या विकासासाठी/ विक्रीसाठी/हस्तांतरणासाठी कामगार आयुक्त यांचेकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र.नाहप्र-२००७/प्र.क्र.४७७१/काम-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांकः- 12 JAN 2009

**वाचा:-** शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र.नाहप्र-२००७/प्र.क्र.४७७१/काम-२, दि. ३०.१०.२००७.

**प्रस्तावना :-**

राज्यातील बंद पडलेल्या कंपन्या/कारखाने/गिरण्या यांच्या जमिनीचा विकास/विक्री करतांना व कंपन्यांच्या जमिनीचे कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करतांना, कामगार आयुक्त यांचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याबाबत, दि. ३०.१०.२००७ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयामध्ये दुरुस्ती करुन, कामगारांची कायदेशीर देणी पूर्णपणे अदा व्हावीत या दृष्टीकोनातून व कामगारांच्या व्यापक हितासाठी आवश्यक तो बदल करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

**शासन निर्णयः-**

महाराष्ट्र राज्यामधील यापूर्वी बंद पडलेल्या किंवा कामगार आयुक्त,मुंबई यांनी यापूर्वी औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ च्या कलम २५ (ओ) अंतर्गत बंद करण्यास परवानगी दिलेल्या किंवा यापूर्वी कार्यरत असलेल्या, परंतू सदरील जमिनींवर सध्या कोणत्याही उद्योगाचे अस्तित्व नाही व सदरील जमिन मोकळया स्वरुपात (Open Plot) आहे अशा कंपन्याच्या/कारखान्यांच्या/गिरण्यांच्या/आस्थापनांच्या जमिनीचा औद्योगिक वापरातून रहिवास/वाणिज्यिक/व्यापारी वापरासाठी बदल करताना किंवा विकास करतांना किंवा विक्रीद्वारे वा भाडेतत्त्वावर/लिलावाद्वारे दुस-या उद्योगाच्या नावे हस्तांतरण करताना अशा उद्योगांमध्ये त्यावेळी कार्यरत असलेल्या सर्व कामगारांची तसेच ज्या उद्योगांच्या जमिनीचा विकास करण्यास नगर पालिका/ महानगरपालिका / एमआयडीसी/सिडको /सिकॉम यांनी किंवा संबंधित यंत्रणेने यापूर्वी परवानगी दिली असेल परंतु कामगारांची देणी अद्याप अदा करण्यात आलेली नसतील व या संदर्भात कामगारांच्या/कामगार संघटनांच्या तक्रारी असतील तर या सर्व कामगारांची कायदेशीर देणी प्रथम अदा करणे आवश्यक आहे .

कामगारांची कायदेशीर देणी पूर्णपणे अदा केली जात नाहीत तो पर्यत संबंधित जमिनीवरील निवासी/वाणिज्यिक/व्यापारी विकासास तसेच विक्रीद्वारे वा भाडेतत्त्वावर/लिलावाद्वारे करण्यात येणा-या कोणत्याही प्रकारच्या हस्तांतरणास शासनाकडून ना-हरकत प्रमाणपत्र दिले जाणार नाही. त्यामुळे संबधित व्यवस्थापनाने/मालकाने/विकासकाने कामगारांची संपूर्ण कायदेशीर देणी अदा करुन, कामगारांची कोणतीही कायदेशीर देणी प्रलंबित नसल्याबाबतचे नॉ-हरकत प्रमाणपत्र कामगार आयुक्त, मुंबई यांच्याकडून शासनाच्या मान्यतेने प्राप्त करुन घेणे बंधनकारक करण्यात येत आहे.

परंतु कायदेशीर देणी संदर्भातील काही प्रकरणे न्यायिक प्राधिकरणाकडे/उच्च न्यायालयात/सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असतील आणि संबंधित उद्योगांचे व्यवस्थापन/मालक /विकासक कामगारांची प्रलंबित देणी देण्यास तयार असतील,अशा प्रकरणी संबंधित कामगार संघटनांच्या प्रतिनिधींशी/कामगारांशी चर्चा करुन ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत, न्यायालयीन आदेश असतील तर त्यानुसार किंवा तडजोडीच्या तत्वानुसार, योग्य तो अंतिम निर्णय घेण्यास शासन सक्षम प्राधिकारी असेल.

२. **कामगारांची कायदेशीर देणी अदा न करता किंवा कामगारांची कायदेशीर देणी देण्यास टाळाटाळ करुन संबंधित जमीनीवर विकासाची/विक्रीची किंवा हस्तांतरणाची प्रक्रिया सुरु केली असेल तर अशा जमीनीवरील विकास/विक्री प्रक्रियेस कोणत्याही टप्प्यावर कायदेशीर तरतुदींप्रमाणे, Stop Work Notice देण्यात येईल.**

३. औद्योगिक वापरातून निवासी/वाणिज्यिक/व्यापारी वापरासाठी बदल करणा-या किंवा बदल करु इच्छिणा-या किंवा भाडेतत्त्वावर/लिलावाद्वारे हस्तांतरण/विक्री करु इच्छिणा-या सर्व कंपनी/कारखाना/आस्थापना/ गिरण्यांना सदर शासन निर्णय भूतलक्षी/पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्यात येत आहे.

४. संबंधित कंपनी/कारखाना/आस्थापना/गिरणीच्या व्यवस्थापनाने/मालकाने/विकासकाने असे प्रस्ताव संबधित स्थानिक/ क्षेत्रिय अपर कामगार आयुक्त /उप कामगार आयुक्त यांचे कार्यालयामार्फत शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Kavita Gupta

कविता गुप्ता
सचिव (कामगार)

प्रतिः- १) कामगार आयुक्त,
कॉमर्स सेंटर,
ताडदेव, मुंबई-३४.

२) मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,
उद्योग सारथीं, महाकाली गुंफा मार्ग,
अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०९३.

३) व्यवस्थापकीय संचालक,
सिडको, निर्मल, नरीमन पॉईंट, मुंबई.

४) व्यवस्थापकीय संचालक,
सिकॉम, निर्मल १ ला मजला,
नरिमन पॉईट, मुंबई.

C:\MoreG.r. No objection (AB)_devlop.lwp

प्रत:- १) मा. मुख्यमंत्री महोदयांचे सचिवालय
२) मा. उप मुख्यमंत्री महोदयांचे सचिवालय
३) मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव
४) मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव
५) प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) सर्व महानगरपालिका आयुक्त
७) सर्व नगर परिषद मुख्याधिकारी
८) महानगर आयुक्त, मुंबई, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा.
९) राज्यातील सर्व जिल्हाधिकारी
१०) अपर कामगार आयुक्त, कॉमर्स सेंटर, ताडदेव, मुंबई.
११) अपर/अतिरिक्त कामगार आयुक्त,(कोकण विभाग),कॉमर्स सेंटर, ताडदेव, मुंबई
१२) अपर कामगार आयुक्त, नागपूर, नागपूर.
१३) अपर कामगार आयुक्त, पुणे, पुणे.
१४) उप कामगार आयुक्त, मुंबई शहर, मुंबई उपनगर पूर्व, मुंबई उपनगर पश्चिम
१५) उप कामगार आयुक्त, ठाणे
१६) उप कामगार आयुक्त, नाशिक
१७) उप कामगार आयुक्त, औरंगाबाद.
१८) अवर सचिव , नगर विकास विभाग(११/१३/३०), मंत्रालय, मुंबई.
१९) कक्ष अधिकारी, नवि-९/१२, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.